जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2025
पुढारी

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता राजश्री शाहू सभागृह येथे कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये शांतीची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. 'स्वराज्य आणि राज्यसंस्था' व 'लोकमान्य आणि महात्मा' या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. तसेच, प्रा. डॉ. यशवंतराव थोरात यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2025
पुढारी

# विद्यापीठात ४ ऑक्टोबर रोजी महाकवी कालिदास यांच्या काव्याचे कथन कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संत तुकाराम अध्यासन व अर्थव ज्ञानपीठ प्रतिष्ठानतर्फे दि. ४ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या सेवापूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात महाकवी कालिदास विरचित मेघदूत या काव्याचे कथन व विवेचन डॉ. धर्मश्री लेले करणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. शिर्के असतील. प्रमुख उपस्थिती प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2025
तरुण भारत

# 'छत्रपती शिवाजी महाराज : जीवन व कार्य' कोर्सला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागामध्ये छत्रपती शिवाजी महाराज : जीवन व कार्य हा हा मॅसिव्ह ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाची नोंदणी आजपासून सुरू झाली आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर अभ्यासक्रम पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपाचा आहे. यामध्ये कोणालाही प्रवेश घेता येणार आहे. यामध्ये दर्जेदार व वैविध्यपूर्ण माहिती असणार आहे. तर ई-बुक्स स्वरूपात संदर्भ साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याची परीक्षा व स्वाध्याय ऑनलाईन स्वरूपातच होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी आपल्या स्टुडंट पोर्टलमधील एलएमएस द्वारे प्रवेश निश्चत करावा, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2025
पुढारी

# शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावरील ऑनलाईन कोर्सची आजपासून नोंदणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावरील 'छत्रपती शिवाजी महाराज : जीवन व कार्य' या कोर्सची ऑनलाईन नोंदणी १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. हा कोर्स पूर्णवेळ ऑनलाईन असून कोणालाही प्रवेश घेता येणार आहे. ई-बुक्स स्वरूपातील संदर्भ साहित्य उपलब्ध असणार आहे. तसेच परीक्षा व स्वाध्याय ऑनलाईन असणार आहे. दरम्यान, अधिसभेत ठराव मंजूर झाला. त्याचा पाठपुरावा केला तरीही काम संथगतीने सुरू होते. चार महिने पाठपुरावा केला तरीही विद्यापीठाने दखल घेतली नाही. त्यानंतर गांधी जयंतीपासून बेमुदत आंदोलनाचा इशारा दिल्यावर प्रशासन जागे झाले असून कोर्स नोंदणी केली. यामुळे आंदोलन मागे घेत असल्याचे अॅड. अभिषेक मिठारी यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2025
लोकमत

# 'शिवाजी महाराज : जीवन व कार्य' ऑनलाइन कोर्ससाठी नोंदणी सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने 'छत्रपती शिवाजी महाराज : जीवन व कार्य' हा मॅसिव्ह ऑनलाइन कोर्स सुरू केला आहे. त्याची नोंदणी आज बुधवारपासून सुरू होत आहे. या अभ्यासक्रमासाठी कुणालाही प्रवेश घेता येणार आहे. ई-बुक्स स्वरूपात संदर्भ साहित्य असेल. तीन वर्षांपूर्वी अधिसभेच्या बैठकीत मंजूर केला होता. मात्र, हा कोर्स अद्यापही सुरू न केल्याने अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी येत्या २ ऑक्टोबरपासून उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.